# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१


## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/ ५६२ /२०२४-२५ दि. २३/०१/२०२५

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** जनहित याचिका क्र.१५५/२०११ च्या अनुषंगाने कार्यमानक प्रणाली (SoPs) संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** १) जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मा. उच्च न्यायालय प्रकरणी दि.०९/१०/२०२४, दि.१८/११/२०२४ व दि.१९/१२/२०२४ रोजीचे आदेश
२) जा.क्र.नप्रसं/का-०६/२०२४/ जहिया-१५५/२०११/८६८५ दि.२०/१२/२०२४ रोजीचे नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र.
३) कार्यमानक प्रणाली (SoPs) जा.क्र.मनपा/जाहिरात/५५४/२०२४-२५ दि.२२/०१/२०२५ रोजीची

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिरा-भाईदर महानगरपालिका अनधिकृत जाहिरातींवर करावयाच्या कार्यपध्दतीची नव्याने कार्यमानक प्रणाली (SoPs) तयार करण्यांत आलेली असुन सदर कार्यमानक प्रणाली संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यांत यावी.

**सोबत :-** कार्यमानक प्रणाली (SoPs) प्रत.

(कल्पिता पिंपळे)
उपआयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**वाचले :- १) मा.म उच्च न्यायालय येथील जनहित याचिका क्र.१५५/ २०११ सुस्वराज्य फाऊंडेशन सातारा व इतर विरुध्द जिल्हाधिकारी सातारा व इतर याचिकांमधील दि.०६/०८/२०१४, दि.३१/०१/२०१७,दि.०९/१०/२०२४,दि.१८/११/२०२४ व दि.१९/१२/२०२४ रोजीचे आदेश.**

**२) जा.क्र.मनपा/उपआयुक्त/६९/२०१४-१५ दि.०५/०९/२०१४ रोजीचे आदेश.**

**३) जा.क्र.मनपा/जाहिरात/१४४/२०१८-१९ दि.२७/०९/२०१८ रोजीचे आदेश.**

**४) जा.क्र.मनपा/सा.प्र./९४०/२०१७-१८ दि.०१/०१/२०१८ रोजीचे आदेश.**

**५) महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२. दि.०९/०५/२०२२ रोजीची अधिसुचना**

**६) शासन निर्णय क्र. याचिका -३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२ दि.१४/११/२०२२ रोजीचा शासन निर्णय.**

**७) जा.क्र.मनपा/जाहिरात/४०५/२०२४-२५ दि.३१/१२/२०२४ रोजीचे परिपत्रक.**

---

**जा.क्र.मनपा/जाहिरात/ ५५४ /२०२४-२५**
**दि.२२/०१/२०२५**

## कार्यमानक प्रणाली (SoPs)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४४, २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अंतर्गत तरतूदीनुसार जाहिरात फलकांवर नियंत्रण व नियमन करणेची कार्यवाही करणेत येत असते. सदर अधिनियम व नियमांच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात जाहिराती करिता परवानगी व अनधिकृत जाहिरातींवर कार्यवाही करणे करिता यापूर्वी संदर्भ क्र. ७ नुसार निर्गमित करण्यांत आलेले परिपत्रकामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे कार्यपध्दती (SoPS) तयार करण्यांत येत आहे.

**अ) जाहिराती करिता परवानगी देणेबाबतची कार्यवाही :-**

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी जागा व महानगरपालिका जागेवर होर्डिंग (आकाशचिन्हे) उभारुन त्यावर जाहिरात करणेकामी मुदतीत प्राप्त अर्जावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४४, २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ दि.०९/०५/२०२२ रोजीच्या अधिसुचनेतील नुसार व मा.प्रशासकिय ठराव क्र.२८२ दि.०२/०३/२०२३ मधील मंजुर दरानुसार जाहिरात फी ची आकारणी करणे (वेळोवेळी मंजुर जाहिरात फीच्या दराबाबत होणाऱ्या ठरावानुसार) होर्डिंग (आकाशचिन्हे) व इतर जाहिरात माध्यमे उभारुन जाहिरात प्रदर्शित करणेस परवानगी देण्यांत येईल.

२) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बोर्ड /बॅनर बाबत मा.महासभा ठराव क्र.७२, दि.०५/०९/२०१८ अन्वये शहरात विविध प्रकारचे तसेच विविध आकारमानाचे तात्पूरत्या जाहिरातींसाठी अधिकृत स्थायी होर्डींग/ कॅन्टीलीवर इ. (एम. एस. स्ट्रक्चरवरील) व्यातिरिक्त कोणत्याही ठिकाणी जाहिरात परवानगी देण्यांत येऊ नये तसेच शहरात कोणत्याही जागेवर तात्पुरत्या स्वरुपाचे बॅनर/ बोर्ड/फलक/कमानी/ फ्लॅक्स इत्यादींना परवानगी देण्यांत येऊ नये व अनधिकृत जाहिराती करणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्यांत यावी. असा ठराव पारित झालेला आहे. सदर ठरावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत कोणत्याही ठिकाणी कोणत्याही जागेवर तात्पुरत्या स्वरुपाचे जाहिराती (बॅनर /बोर्ड /फलक /कमानी / फ्लॅक्स) इत्यादीं करिता परवानगी न देण्याचे धोरण आहे. सदर धोरणाचे तंतोतंत पालन करण्यांत येईल.

३) मिरा भाईंदर क्षेत्रातील विविध भागात कायमस्वरूपी जाहिरातीच्या होर्डिंग्ज (आकाशचिन्ह), कॅन्टीलिव्हर पोल, इत्यादी जाहिरात माध्यमावरील एक वर्षाहुन अधिक कालावधीकरीता परवानगी व नुतनीकरणाचे अधिकार उपआयुक्त (जाहिरात) यांना असतील. तसेच एका वर्षाहुन कमी कालावधी करीता तात्पुरत्या जाहिरात माध्यमांना परवानगी व नुतनीकरणाचे अधिकार सहा.आयुक्त (जाहिरात) यांना असतील.

४) होर्डिंग व जाहिरात माध्यमे यावर परवानगी क्रमांक व परवानगी कालावधी मोठ्या अक्षरांमध्ये दर्शविणे तसेच या माहितीचा QR कोड लावणे बंधनकारक असलेबाबत संबंधित जाहिरातदार यांना परवानगी देताना कळविण्यांत येईल व तसा क्रमांक, कालावधी, QR कोड नमूद नसलेले सर्व जाहिरात माध्यमे/ होर्डिंग त्वरित काढून टाकण्याची दक्षता घेण्यांत येईल.

५) जाहिराती करीता उभारण्यात आलेल्या होर्डिंग्स (आकाशचिन्हे) यांचे वेळोवेळी स्ट्रक्चरल ऑडिट (structural audit) करणेबाबत जाहिरातदार यांना सूचित करण्यात येईल व त्याचा अहवाल घेवून धोकादायक होर्डिंगबाबत नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

६) होर्डिंग/ जाहिरात माध्यमांकरीता देण्यांत आलेली परवानगीची यादी सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) यांना देण्यांत येईल.

७) विविध सणांच्या दरम्यान तात्पुरते मंडप तसेच बूथ उभारले जातात या मंडप किंवा बूथ उभारण्याची परवानगी देताना सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र. १ ते ६ यांनी त्यावर कुठलेही अनाधिकृत बोर्ड,बॅनर,फ्लॅक्स, पोस्टर्स इ. किंवा जाहिरात न लावण्याची अट टाकण्यात यावी. तसेच मंडपावर अनधिकृतपणे लावलेले बोर्ड, बॅनर,फ्लॅक्स, पोस्टर्स, घोषणा फलक इ. त्वरित काढून टाकणेत येतील.

**ब) तक्रार निवारण कार्यपध्दती :-**

१) तक्रार निवारणाकरीता महानगरपालिकेमार्फत १८००२२४८४९ टोल फ्री क्रमांक तसेच SMS द्वारे व व्हॉटसअॅप द्वारे तक्रार करण्यासाठी ८६५७०४७४०२ क्रमांक उपलब्ध आहे.

२) सदर तक्रार निवारण यंत्रणेमध्ये टोल फ्री क्रमांक, SMS द्वारे व व्हॉटसअॅप द्वारे, संकेतस्थळावरील ईमेलद्वारे, पी.जी. पोर्टल, आपले सरकार, MY MBMCAPP, ईमेलद्वारे, लेखी पत्राद्वारे, नागरी समिती मार्फत प्राप्त तक्रारी, निनावी तक्रार इ. तक्रारी प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली असल्यास सदर तक्रारींची नोंद संबंधित सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) यांचे कार्यालयात घेण्यांत यावी. मुख्य कार्यालयास, टोल फ्री क्रमांक (१८००२२४८४९), SMS द्वारे व व्हॉटसअॅप (८६५७०४७४०२) द्वारे प्राप्त झालेली तक्रारींची एकत्रित नोंद अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग यांचे नोंदवही नमुना 'अ' मध्ये घेऊन पुढील नियमानुसार कारवाई करीता सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) यांना वर्ग करण्यांत येतील.

३) टोल फ्री क्रमांक, SMS किंवा व्हॉटसअॅप व ईमेल द्वारे इ. प्राप्त तक्रारींची नोंद घेण्यासाठी एक नोंदवही ठेवण्यांत यावी व त्या नोंदवही मध्ये तक्रार प्राप्त दिनांक, वेळ, तक्रारदाराचे नांव, अनधिकृत जाहिरातीचे ठिकाण व तक्रारीच्या अनुषंगान केलेली कार्यवाही यांची नोंद ठेवण्यांत येईल. सदर तक्रारीस क्रमांक देऊन तक्रारदारास केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरुपात उपलब्ध करुन येईल. तसेच MY MBMC APP, आपले सरकार, पी.जी. पोर्टल वर प्राप्त तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित पोर्टलवर अपलोड करणेत येतील.

**<u>क) अनधिकृत मुदतबाह्य /विनापरवानगी /परवानगी पेक्षा जास्त जाहिरातींवर कारवाई करणेबाबत करावयाची कार्यपध्दती :-</u>**

१) अनधिकृत मुदतबाह्य /विनापरवानगी /परवानगी पेक्षा जास्त जाहिराती होर्डिंग/बोर्ड/ लिफ्लंट्स/ पॅम्पलेट्स/ कटआऊट/ अॅडपोल/ झेंडे इ. वर सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.१,२,३,४,५,६, यांचे मार्फत त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये तात्काळ नियमितपणे प्रभावी कारवाई करणेत येईल.

२) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अथवा अनधिकृत मुदतबाह्य /विनापरवानगी /परवानगीपेक्षा जास्त जाहिराती आढळल्यास सदर जाहिरातींवर संबंधित क्षेत्रातील सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय) यांचे मार्फत अथवा त्यांचे अधिनस्त कनिष्ठ अभियंता, फेरीवाला पथक प्रमुख/ अतिक्रमण निर्मुलन पथक यांचे कडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करण्यांत येईल. विनापरवानगी अथवा अनधिकृत जाहिराती आढळल्यास सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय) यांचे मार्फत अथवा त्यांचे अधिनस्त कनिष्ठ अभियंता, फेरीवाला पथक प्रमुख/ अतिक्रमण निर्मुलन पथक ह्यांचे कडून सदर जाहिरात फलकांवर तात्काळ निष्कासन कारवाई करण्यांत येईल. तसेच सदर निष्कासन कामी आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीद्वारे व वाहन इ. व्यवस्था विभागप्रमुख तथा सहा.आयुक्त (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांनी उपलब्ध करुन देण्यांची तजवीज करतील.

३) कुठल्याही व्यक्तीच्या वाढदिवसानिमित्त किवा कोणत्याही कार्यक्रमा निमित्त तसेच विविध सणांच्या पूर्वी लावले जाणारे अनाधिकृत बोर्ड,बॅनर,फ्लॅक्स, पोस्टर्स, होर्डिंग इ. हे वाढदिवसाच्या किंवा सणाच्या दिनांका पूर्वीच काढून घेण्याची दक्षता संबंधित क्षेत्रातील सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय) घेतील.

४) निष्कासन कारवाई करताना डिजिटल स्वरूपात अनधिकृत जाहिरातींचे फोटोग्राफ व रेकॉर्डींग करण्यात येतील तसेच सदर बाबतीत पंचनामा करण्यांत येईल. हे फोटोग्राफ व रेकॉडींग पुरावे म्हणून जतन करण्यांत येतील व त्यांच्या प्रती पोलिसांना गुन्हा दाखल करतेवेळी उपलब्ध करून देण्यांत येतील.

५) अनधिकृतरित्या उभारण्यात येणाऱ्या होर्डिंग्स, बोर्ड, बॅनर्स, फ्लॅक्स, पोस्टर्स इ. मध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक किंवा इतर विघटनशील पदार्थाचा वापर केला जात असल्याने निष्कासन कारवाईत सातत्य ठेवण्यांत येईल व त्याबाबतचा अहवाल सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.१,२,३,४,५ व ६ हे विभागप्रमुख (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांचे कडे सादर करतील विभागप्रमुख (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांनी त्याबाबतचा एकत्रित मासिक अहवाल उपआयुक्त (जाहिरात) तथा नोडल अधिकारी यांचेकडे सादर करण्यांत येईल.

६) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत व मुदतबाह्य होर्डिंग/बोर्ड/लिफ्लेंट्स/पॅम्पलेट्स/ कटआऊट/ अॅडपोल/झेंडे इ. वर कारवाई बाबत आयोजित विशेष मोहिमेची अंमलबजावणी वेळोवेळी करण्यांत येईल. व त्याबाबतचा एकत्रित अहवाल उपआयुक्त (जाहिरात) तथा नोडल अधिकारी यांचेकडे सादर करण्यांत येईल.

७) प्रभाग कार्यक्षेत्रातील विनापरवानगी अथवा अनधिकृत होर्डिंग्स, बोर्ड, बॅनर्स, फ्लॅक्स, पोस्टर्स इ. तात्काळ काढून टाकणेत येतील व त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यासाठी स्थानिक पोलिस ठाणे यांना पत्र देऊन गुन्हे दाखल करण्यांत यावेत. तसेच सर्व केलेल्या कार्यवाहीचे सर्व आवश्यक दस्तावेज तयार करुन जतन करण्यांत येतील.

**ड) पोलीस यंत्रणा व गुन्हे दाखल बाबत :-**

१) स्थानिक पोलीस स्टेशनने एफ. आय. आर. दाखल करून न घेतल्यास / प्रतिसाद न दिल्यास संबंधित पोलीस नोडल अधिकारी यांचेकडे महानगरपालिका प्रशासन लेखी तक्रार करू शकतात सदर तक्रारीवर नोडल अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे याशिवाय मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये पोलीस विभागास इतर सविस्तर आवश्यक निर्देश दिले आहेत. ते निर्देश पोलिस यंत्रणेवर बंधकारक राहतील.

२) अनधिकृत जाहिराती विरूध्द महाराष्ट्र मालमत्तेचे विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ नुसार संबंधित पोलिस स्टेशन मध्ये महानगरपालिकेमार्फत सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय) यांचेमार्फत गुन्हे दाखल करावेत. याकामी स्थानिक पोलिस स्टेशन यांनी आवश्यक सहकार्य करतील.

३) अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग्ज निष्कासन कारवाई साठी स्थानिक पोलीस प्रशासन यांनी पुरेसे सरंक्षण उपलब्ध करून देणे सदर अनधिकृत होर्डिंग संदर्भात कारवाई करताना पोलीस निरीक्षक किंवा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे पोलिस मदत पुरवतील त्यामध्ये आवश्यक असल्यास हत्यारबंद पोलीस देखील पुरवण्याचे मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश पोलिस यंत्रणेवर बंधकारक असतील.

४) मालमता विरूपण कायद्याचे केले गेलेले उल्लंघन याबाबत मनपा नगरपालिका प्रशासन. कर्मचारी किंवा नागरिक यांच्या लेखी अथवा तोंडी तक्रारीवरून माहिती दिल्यानंतर स्थानिक पोलिस स्टेशन व अधिकारी यांनी एफ. आय. आर. दाखल करून घेणे बंधनकारक राहील. तसेच सदर कायद्याच्या उल्लंघनाची माहिती त्वरित पोलिसांना कळवण्याची जबाबदारी सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.१,२,३,४,५ व ६ यांची असेल.

**इ) तक्रार निवारण व नागरी समिती :-**

१) सहा. आयुक्त (प्रभाग कार्यालय) यांनी प्रत्येक वार्ड निहाय एक नागरिकांची समिती स्थापन करण्यात यावी. तसेच वार्ड निहाय नागरी समिती यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.

२) नागरी समितीने व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घ्यावा तसेच अनाधिकृत बोर्ड, बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग व जाहिराती याबाबत सतर्क राहून नोडल अधिकारी यांच्या लक्षात आणून देतील.

३) प्रत्येक वार्ड निहाय स्थापन केलेल्या नागरी समितीची मासीक बैठक प्रत्येक महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यांत यावी व सदर बैठकीचे इतिवृत्तांत /निर्णय इ. बाबतची माहिती नोडल अधिकारी यांना लेखी स्वरुपात सादर करण्यांत येईल.

**इ) नोडल ऑफिसर यांची कार्यपध्दती :-**

१) सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र.१,२,३,४,५ व ६ तसेच विभागप्रमुख, अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग व सहा. आयुक्त, जाहिरात (जाहिरात) यांच्या कामकाजावर उप-आयुक्त तथा नोडल ऑफिसर (जाहिरात) यांनी नियंत्रण व देखरेख करण्यांत येईल.

२) नोडल अधिकारी यांनी नेमण्यांत आलेल्या पोलीस विभागातील नोडल अधिकारी, महानगरपालिका सहा. आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र. १ ते ६), सहा.आयुक्त (जाहिरात), विभाग प्रमुख ( अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांची एकत्रित बैठक प्रत्येक महिन्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यांत येईल.

३) नोडल अधिकारी, सहा. आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र. १ ते ६), सहा.आयुक्त (जाहिरात) व विभाग प्रमुख ( अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) यांचे संपर्क क्रमांक तसेच कार्यालयीन पत्ता याबाबत महानगरपालिका कार्यालय, वार्ड कार्यालय, तहसील कार्यालय इत्यादी ठिकाणी प्रसिद्धी देतील तसेच मोठ्या सणांच्या पूर्वी ही प्रसिद्धी स्थानिक/ राज्यस्तरीय वर्तमानपत्रात व संकेतस्थळ यांद्वारे देण्यात येईल.

माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या वरील सर्व निर्देशांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल राज्य शासनास सादर करण्यात येईल. अहवाल सादर करताना ज्या राजकीय पक्ष व त्यांचे कार्यकर्ते यांनी अनधिकृत होर्डिंग्ज लाऊन न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान केला आहे त्याच्या नावाचा उल्लेख करण्यांत येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ दि. ०९/०५/२०२२ मधील अधिसुचनेमधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यांत येईल.

मा. उच्च न्यायालयाने दिलेले सर्व निर्देश पाळले जात आहेत याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित सहा.आयुक्त, प्रभाग कार्यालय क्र .१,२,३,४,५,६ , सहा.आयुक्त तथा विभागप्रमुख, (अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) व सहा.आयुक्त (जाहिरात) यांची असेल.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेश व त्याअनुषंगाने शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश/ परिपत्रके यांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) यांची असेल. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सहा.आयुक्त (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) हे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अन्वये कारवाईस पात्र राहतील.

**(संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**